


दैनिक
निडर निर्भिड
# जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ
Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com RNI NO-MAHMAR/2022/90217

वर्ष ३ रे | अंक : २८० वा | गुरूवार दि २२ जानेवारी २०२६ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये

# कायस्थ समाज पुन्हा सत्तेच्या केंद्रात योगायोग की रणनीती?

## फक्त १% लोकसंख्या पण थेट दिल्लीची कमान! नितिन नबीन कोण? ज्यांच्यावर भाजपाने टाकला राष्ट्रीय विश्वास

**जनसंचलन/बुलढाणा**

भारतीय जनता पक्षाने बिहारचे मंत्री व आमदार नितिन नबीन यांची राष्ट्रीय कार्यकारी अध्यक्ष म्हणून नियुक्ती करून राजकीय वर्तुळात खळबळ उडवली आहे. ओबीसी किंवा दलित समाजातून अध्यक्ष निवड होईल, असे कयास असताना कायस्थ समाजातील नेत्याकडे पक्षाची धुरा देणे हा भाजपाचा महत्त्वाचा राजकीय डाव मानला जात आहे. कायस्थ समाजाची लोकसंख्या देशभरात साधारणतः १.५ ते २ कोटी (सुमारे १ ते १.५ टक्के) इतकी असली, तरी उत्तर प्रदेश, बिहार आणि पश्चिम बंगाल या राज्यांत या समाजाचा राजकीय, प्रशासकीय व बौद्धिक प्रभाव मोठा आहे. शिक्षण, प्रशासन आणि संघटन कौशल्यामुळे कायस्थ समाजाने कायमच निर्णायक भूमिका बजावली आहे. इतिहासात पाहिल्यास, मुगल व ब्रिटिश





काळात कायस्थांना लेखक, मुंशी, लिपिक, महसूल व्यवस्थापन अशी जबाबदारी मिळाली. १०११व्या शतकापासून त्यांच्या अस्तित्वाचा उल्लेख आढळतो. उच्च शिक्षण व प्रशासनातील पकड यामुळे स्वातंत्र्य चळवळीतही या समाजाचा ठसा उमटला. देशाचे पहिले राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद आणि माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री हे कायस्थ समाजातूनच होते. साहित्य क्षेत्रात मुंशी प्रेमचंद, हरिवंशराय बच्चन, तर विज्ञानात जगदीशचंद्र बोस, सत्येंद्रनाथ बोस, शांती स्वरूप भटनागर यांनी भारताचा गौरव वाढवला. स्वातंत्र्यलढ्यात सुभाषचंद्र बोस, चित्तरंजन दास, रासबिहारी बोस, खुदीराम बोस, गणेश शंकर विद्यार्थी यांचे योगदान अविस्मरणीय आहे. नितिन नबीन यांच्या नियुक्तीमुळे भाजपाला शहरी, मध्यमवर्गीय व बौद्धिक मतदारांमध्ये नवे बळ मिळेल, असा अंदाज व्यक्त होत आहे. कमी लोकसंख्या असूनही व्यापक प्रभाव असलेल्या कायस्थ समाजाकडे नेतृत्व सोपवून भाजपाने आगामी राजकीय समीकरणांसाठी महत्त्वाचा संदेश दिला आहे.

# चिखलीत रक्ताच्या नात्याला काळीमा! मंत्री काकाकडून पुतण्याची हत्या...



**जनसंचलन/ हातनी**

मंत्री नावाचा काका रक्ताचा तहानलेला निघाला! एकाच घरात राहणाऱ्या काका-पुतण्यात किरकोळ वादातून थेट हत्या झाली आणि अवघं गाव हादरून गेलं. हातनी ता. चिखली येथे काल रात्री सुमारे ११ वाजण्याच्या सुमारास काकानेच पुतण्याचा निर्घृण खून केल्याची धक्कादायक घटना घडली. मृतक गोपाल अजबराव जाधव (वय २४, रा. हातनी) हा स्वतःच्या राहत्या घरात असताना काका विनोद रामचंद्र जाधव उर्फ मंत्री याच्याशी किरकोळ कारणावरून वाद झाला. क्षणातच हा वाद हिंसक झाला आणि संतापाच्या भरात काकाने कुऱ्हाडीच्या मागच्या भागाने गोपालच्या डोक्यावर व छातीत जोरदार वार केले. रक्ताच्या थारोळ्यात गोपाल जागीच ठार झाला. घरातच घडलेल्या या क्रूर हत्येने परिसरात भीतीचं वातावरण पसरलं. घटनेची माहिती मिळताच गावकऱ्यांनी तात्काळ चिखली पोलिसांना कळवलं. मात्र, पोलिस येत असल्याची खबर आरोपी मंत्री याला लागताच तो अंधाराचा फायदा घेत घटनास्थळावरून फरार झाला. अंधारात तो मक्याच्या शेतात लपून बसल्याचं समोर आलं. चिखली पोलिसांनी कसून शोध मोहीम राबवत अवघ्या दोन तासांत आरोपीला शेतातून ताब्यात घेतलं. ही धडक कारवाई चिखली पोलीस स्टेशनचे ठाणेदार भूषण गावंडे यांच्या मार्गदर्शनाखाली डी.बी. पथकातील अमोल गवई, प्रशांत धंदर, राहुल पायघन, अजय इटावा आणि अमोल इंगळे यांनी केली. आरोपीला अटक करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे. किरकोळ वादातून रक्ताचं नातं संपवणाऱ्या मंत्रीच्या कृत्यामुळे हातनी गाव सुन्न झालं आहे. कायद्याचा धाक न मानणाऱ्या अशा प्रवृत्तींवर कठोर कारवाईची मागणी नागरिकांकडून होत आहे.

# संकटांच्या गर्तेतून उभारी घेतलेला योद्धा : रिक्की काकडे

राजकारण हा सत्तेचा खेळ असला, तरी काहींसाठी तो संघर्षाचा, तर काहींसाठी अस्तित्वाचा प्रश्न असतो. समाजकारणाची तळमळ, नेतृत्वाची आग आणि अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची हिंमत असलेले युवक आपोआप राजकीय प्रवाहात ओढले जातात. मात्र संकटे आली की माघार घेण्याऐवजी अधिक ठामपणे उभे राहणारे तरुण दुर्मिळच. अशाच एका दुर्मिळ युवा राजकीय कार्यकर्त्याच्या वैयक्तिक आयुष्यात व राजकीय प्रवासात आलेल्या चढउतारांचा आढावा घेणारा आणि त्याचा खंबीर आत्मविश्वास दाखवणारा व युवा मित्रांना दिलेला संदेश सांगणारा हा लेख.

चिखली नगरपरिषद निवडणुकीत चर्चेचा केंद्रबिंदू ठरलेले विशाल उर्फ रिक्की देवानंद काकडे हे एक लक्षवेधी नाव. कट, कारागृह आणि अपमानाच्या छायेतही लोकांशी नाळ न तुटू देता त्यांनी आपली राजकीय वाटचाल पुढे नेली. चिखली शहरातील चिंच परिसरात, जुन्या नटराज टॉकीजच्या मागील भागात वास्तव्यास असलेल्या काकडे कुटुंबात जन्मलेले विशाल काकडे हे अवघ्या ३१ वर्षांचे युवक नेतृत्व. बी.ई. आणि एम.बी.ए. शिक्षण घेत असतानाच समाजसेवा आणि राजकारण यांची सांगड घालण्याचा त्यांनी निर्धार केला. २०१७ पासून राष्ट्रवादी काँग्रेसच्या माध्यमातून त्यांच्या राजकीय प्रवासाची सुरुवात झाली. राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हा सचिव म्हणून काम करताना युवकांचे संघटन, कार्यकर्त्यांशी थेट संवाद आणि बूथ पातळीवरील बांधणी यावर त्यांनी भर दिला. पुढे २० सप्टेंबर २०२२ रोजी माजी आमदार व काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राहुल बोंद्रे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून त्यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला आणि युवक काँग्रेसच्या चिखली शहराध्यक्षपदाची जबाबदारी स्वीकारली.

रिक्की काकडे यांचे राजकारण निवडणुकांपुरते मर्यादित राहिले नाही. युवकांमध्ये पक्षाची विचारधारा रुजावी म्हणून त्यांनी चिखली शहरात युवक काँग्रेसच्या तब्बल ६८ शाखा उभारल्या. रक्तदान शिबिरे, स्वच्छता अभियान, गरजू नागरिकांना प्रधानमंत्री आवास योजनेचा लाभ, निराधार महिलांना श्रावणबाळ योजनेत समाविष्ट करण्यासाठी सातत्यपूर्ण पाठपुरावा ही त्यांची कार्यपद्धती ठरली. धार्मिक क्षेत्रातही त्यांनी सक्रिय भूमिका घेतली. अयोध्येतील श्रीराम जन्मभूमी मंदिराच्या लोकार्पणानिमित्त अखंड हनुमान चालीसा पठण, तत्वबोध रामायणाचे पारायण आणि १००८ दीप प्रज्वलन असे उपक्रम राबवून त्यांनी धर्माला राजकीय गाजावाजा न करता सामाजिक एकात्मतेचे माध्यम बनवले. कुलस्वामिनी नवरात्र उत्सव मंडळ आणि जय श्री महाकाल गणेशोत्सव मंडळाच्या माध्यमातून सांस्कृतिक जाणीव अधिक बळकट केली. कोरोना महामारीच्या काळात जेव्हा सत्ताधारी यंत्रणा अपुरी पडत होती, तेव्हा विशाल काकडे आणि काकडे कुटुंबाने तब्बल ६२ दिवस स्वखर्चातून अन्नछत्र चालवले. राजकारण बाजूला ठेवून ङ्गमाणूस म्हणून जगण्याची जबाबदारीफ त्यांनी स्वीकारली. या काळात मिळवलेला लोकांचा विश्वासच त्यांच्या राजकीय भांडवलाचा खरा आधार ठरला. २०२५ च्या डिसेंबरमध्ये होणाऱ्या नगरपरिषद सार्वत्रिक निवडणुकीत काँग्रेसकडून लढण्याचा त्यांचा निर्धार होता. मात्र ऐनवेळी कौटुंबिक वादातून झालेल्या पोलीस तक्रारीमुळे ९ नोव्हेंबर २०२५ रोजी विशाल काकडे यांना अटक करण्यात आली. निवडणूक तोंडावर असताना कारागृहात जाणे म्हणजे राजकीय मृत्यूच, असा समज असतो. मात्र वडील देवानंद काकडे यांच्या खंबीर पाठिंब्यामुळे ते खचले नाहीत. १७ नोव्हेंबर रोजी पॅरोलवर एका दिवसासाठी बाहेर येत त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस



(अजित पवार गट) तर्फे प्रभाग क्रमांक १३ मधून उमेदवारी अर्ज दाखल केला. २६ नोव्हेंबरला जामिनावर सुटका झाली, तेव्हा मतदानाला अवघे चार दिवस उरले होते. तरीही त्यांनी संपूर्ण प्रभागात घरोघर जाऊन मतदारांशी थेट संवाद साधला. स्वतः चे मतदान नसलेल्या प्रभागातही जनतेने त्यांच्या प्रामाणिकपणावर विश्वास ठेवत ७४१ मते दिली आणि ते दुसऱ्या क्रमांकावर राहिले. प्रचारादरम्यान सव्वातीन वर्षांचा मुलगा माही वडिलांसाठी मत मागताना पाहून अनेक मतदार भावुक झाले. ज्यांच्यासाठी मी जिवाचे रान केले, त्यांनीच संकटकाळी पाठ फिरवली,फ्फ अशी खंत व्यक्त करत असतानाच, अडचणीच्या काळात राजकीय पुनर्वसनाची संधी दिलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसला बळकट करण्याचा निर्धार रिक्की काकडे व्यक्त करतात. युवकांचे संघटन, गोरगरिबांना शासकीय योजनांचा लाभ, सामाजिक व धार्मिक कार्य अखंड सुरू ठेवणे, भ्रष्टाचाराला वाचा फोडणे, आंदोलन करणे जनसामान्यांच्या आरोग्यासाठी प्रश्नांची उत्तरे मागण्यासाठी प्रशासनाला भांडणे हीच त्यांची पुढील वाटचाल आहे. राजकारण हा सापशिडीचा खेळ आहे; त्यामुळे तरुणांनी आर्थिकदृष्ट्या सक्षम होऊन, कुटुंबाला भक्कम आधार देऊनच या क्षेत्रात उतरावे हा अनुभवातून उमटलेला सडेतोड संदेश ते युवकांना देतात.

इतर राजकीय पक्षांनाही विशालच्या निष्ठावान पक्षकार्याचा हेवा वाटावा असे त्याचे कार्य राहिले. नगरसेवक म्हणून आपण असे काम करू की, जे काम इतर पक्षातील कार्यकर्त्यांसाठी उदाहरण बनेल अशी विशालची म्हणजे रिक्कीची तळमळ होती. या निवडणुकीत सोशल मीडियावर जाणीवपूर्वक रंगवून पसरवलेल्या अफवांकडे दुर्लक्ष करत, ङ्गरिक्की हा एक सच्चा आणि कर्तव्यनिष्ठ युवक आहेफ या विश्वासातून त्याच्या पाठीशी ठामपणे उभे राहिलेली समाजातील प्रतिष्ठित मंडळी, सर्वसामान्य नागरिक, गोरगरीब, मजूर, माता - भगिनी आणि युवकांचे पाठबळ खरोखरच वाखाणण्याजोगे आहे. स्वतः च्या कौटुंबिक दुःखांना कधीही जाहीर न करता, संपूर्णपणे पक्षकार्यात स्वतःला वाहून घेणाऱ्या या युवा कार्यकर्त्याला सर्वांनीच आपला नगरसेवक म्हणून पाहण्याची प्रचंड आशा बाळगली होती. मात्र, नियतीच्या मनात काही वेगळेच होते. तरीही, या सर्व संकटांमधून सावरत विशाल उर्फ रिक्की काकडे पुन्हा एकदा राजकीय मैदानात नव्या जोमाने, नव्या ऊर्जेने पुनश्च ङ्गहरिओमम करेल, याबाबत कोणतीही शंका नाही. हीच खात्री आज त्याच्या समर्थकांच्या मनात ठामपणे घर करून आहे.






The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# कल्याण डोंबिवलीतील घडामोडींवरुन राज ठाकरे खूप व्यथित', संजय राऊत यांचा गौप्यस्फोट



**मुंबई :** केडीएमसी महापालिका निवडणुकीच्या निकालानंतर आता महापौर पदासाठी रस्सीखेच सुरु आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला इथे ५३ जागांवर यश आले आहे. महापौर पदासाठी ६२ जागांची आवश्यकता आहे. त्यासाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या ४ नगरसेवकांना खासदार श्रीकांत शिंदे यांनी गळाला लावल्याची चर्चा आहे. तसेच मनसेच्या ५ नगरसेवकांनी गट स्थापन करुन एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला पाठिंबा दिला आहे. मनसे नेते राजू पाटील हे स्वत: त्या नगरसेवकांसोबत शिंदेंना पाठिंबा देण्यासाठी गेल्याची माहिती आहे. मनसेच्या नगरसेवकांनी शिंदे गटाला दिलेल्या पाठिंब्यावर शिवसेना ठाकरे गटाने आक्षेप घेतला आहे. खासदार संजय राऊत यांनी माध्यमांसमोर येऊन भूमिका मांडली आहे.राज ठाकरे खूप व्यथित आहेत. राज ठाकरेंचं म्हणणं आहे की, ही माझी भूमिका नाहीय. ही माझी पक्षाची भूमिका नाही. स्थानिक नेत्यांचा निर्णय आहे. स्थानिक नेत्यांनी पक्षाच्या विरोधात भूमिका घेतली असेल तर त्यांच्यावर कारवाई व्हायला हवी', अशी मागणी संजय राऊत यांनी केली आहे.आमची भूमिका फार वेगळी आणि कडवट आहे. ज्याने महाराष्ट्राशी, हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्याशी, मराठी माणसाशी गद्दारी आणि बेईमानी केली. त्यांच्याबरोबर कोणत्याही प्रकारचे राजकीय किंवा अन्य संबंध ठेवायचे नाहीत. महाराष्ट्राच्या गद्दारांना मदत होईल, अशी भूमिका घ्यायची नाही. सत्ता येते आणि सत्ता जाते. आम्ही सत्तेसाठी हापापलेले लोकं नाहीत. स्वत: राज ठाकरे नाहीत. त्यामुळे आमच्या भूमिका स्पष्ट आहेत', असं खासदार संजय राऊत म्हणाले.कल्याण डोंबिवलीचा विषय समोर आलेला आहे. तो अत्यंत चिंताजनक आहे. त्यांचं असं म्हणणं आहे की, स्थानिक पातळीवरचा निर्णय आहे. असू शकेल. जर पक्षाच्या मूळ ध्येय धोरणांशी प्रतारणा करुन कोणत्याही पक्षाचे स्थानिक नेतृत्व विपरीत भूमिका घेत असेल तर पक्ष नेतृत्वाने त्यांच्यावर कारवाई केली पाहिजे. पक्ष नेतृत्वाने त्यांच्यावर कायदेशीर पक्षातून निलंबित करण्याची कारवाई केली पाहिजे', अशी मागणी संजय राऊत यांनी केली.अंबरनाथमध्ये काँग्रेस पक्षाच्या १२ नगरसेवकांनी भाजप बरोबर संघ करताच त्यांच्या पक्षाने ताबोडतोब पक्षाच्या ध्येय धोरणांशी प्रतारणा केल्याबद्दल पक्षातून काढून टाकलं. ही कुठली व्यवस्था आहे? फक्त स्थानिक पातळीवर विषय झाला, असं सांगून विषय संपत नाहीत. शिवसेना ठाकरे गट आणि मनसे एकत्र येत आहेत. त्यांनी एकत्र निवडणुका लढल्या आहेत. अशावेळेला कुणी एखाद्या चिन्हावर निवडून येऊन बेडूक उड्या मारत असेल तर पक्षाच्या नेतृत्वाने भूमिका घेतली पाहिजे. त्या पक्षाच्या नेतृत्वाने त्यांच्यावर कारवाई करुन महाराष्ट्राला दाखवायला पाहिजे की, या भूमिकेशी आम्ही सहमत नाहीत', अशी भूमिका संजय राऊत यांनी मांडली आहे. मराठी माणसासाठी शिंदे गट एमआयएम आहे. महाराष्ट्रद्रोही आहे. सत्ता मिळाली नाही म्हणून अशा प्रकारे बेईमानी करणाऱ्यांना महाराष्ट्र माफ करत नाही. तुमची काही वैयक्तिक कारणे असू शकतात. ते तेवढ्यापुरतेच ठेवायला पाहिजे. काही लोकांच्या मागे तपासयंत्रणा लागल्या असतील. त्यासाठी कुणीही पक्ष वेठीस धरणं आणि महाराष्ट्राच्या गद्दारांशी हातमिळवणी करणं हे पूर्णपणे चुकीचं आहे', असं राऊत म्हणाले.माझ्या स्वत:वर ईडीचं संकट आलं. मी पक्षाला वेठीस धरलं नाही. मी त्या संकटाशी सामना केला. आज माझी प्रकृती अत्यंत खराब आहे. मी ऑपरेशन थिएटरमधून बाहेर आलो आहे. कल्याण डोंबिवलीचं प्रकरण उद्धव ठाकरे यांनी अत्यंत गांभीर्याने घेतलेला आहे. राज ठाकरे यांच्यासोबत माझी चर्चा झालेली आहे. काही मिळालं नाही तर मी सोडून जातो अशा मानसिकतेचे काही लोकं असतात, असं त्यांचं म्हणणं आहे. एकंदरीत राजकारणातील मानसिक स्थिरतेचं हा प्रश्न आहे, असं ते म्हणाले. ते खरं आहे', असं मत संजय राऊत यांनी मांडलं.

'पक्षांतर करणारे हे राजकीय मनोरुग्ण आहेत. मला आताच काहीतरी हवं आहे म्हणून विकासाच्या नावाने पक्षांतर वाढत आहे. महाराष्ट्रात अशापक्षांतराची कीड रोखणं हे न्यायालयाचं काम असलं तरी त्या सर्वोच्च न्यायालयाने माती खालली आहे. आजही शिवसेना पक्ष चिन्ह आणि नावावर सुनावणी असताना तारीख पुढे ढकलणं त्याला माती खाणं म्हणतात. देशाच्या ऱ्हासाला हातभार लावणं याला म्हणतात. सर्वोच्च न्यायालय त्याला हातभर लावत आहे', अशी टीका संजय राऊत यांनी केली.

## पालकमंत्री पदाच्या शर्यतीत शिंदेसेनेने मारली बाजी?

**रायगड :** रायगड जिल्ह्याच्या मुख्यालय असलेल्या अलिबागमध्ये यंदाच्या प्रजासत्ताक दिनाचा शासकीय ध्वजारोहण सोहळा रोजगार हमी व फलोत्पादन मंत्री भरत गोगावले यांच्या हस्ते पार पडणार आहे. यासंदर्भात मंत्रालयाच्या सामान्य प्रशासन विभागाने अधिकृत परिपत्रक काढून गोगावले यांचे नाव निश्चित केल्याने, गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या चर्चांना पूर्णविराम मिळाला आहे. मात्र, या निर्णयामुळे रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदावरून सुरू असलेली शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसमधील राजकीय रस्सीखेच पुन्हा चर्चेत आली आहे.महायुतीची सत्ता स्थापन होऊन बराच कालावधी उलटून गेला असला तरी रायगड जिल्ह्याला अद्याप अधिकृत पालकमंत्री जाहीर करण्यात आलेला नाही. त्यामुळे अलिबागमधील प्रजासत्ताक दिनाच्या ध्वजारोहणाचा मान कोणाला मिळणार, यावरून गेल्या काही दिवसांपासून राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा रंगल्या होत्या. गतवर्षी प्रजासत्ताक दिन आणि स्वातंत्र्यदिनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले होते. त्या वेळी मंत्री भरत गोगावले यांनी नाराजी व्यक्त केली होती; मात्र वरिष्ठांचा निर्णय मान्य असल्याचे त्यांनी स्पष्ट केले होते.यंदा मात्र मंत्रालयाने थेट परिपत्रक जारी करून भरत गोगावले यांच्या नावावर शिक्कामोर्तब केल्याने राजकीय समीकरणे बदलल्याचे चित्र दिसत आहे. जिल्हा मुख्यालयात ध्वजारोहण करण्याची संधी मिळणे हे गोगावले यांच्यासाठी राजकीयदृष्ट्या महत्त्वाचे मानले जात आहे.



पालकमंत्रीपदासाठी इच्छुक असलेल्या गोगावले यांना हा मान मिळाल्याने त्यांच्या समर्थकांमध्ये उत्साहाचे वातावरण असून, अलिबागमध्ये जल्लोषाची तयारी सुरू झाली आहे. दरम्यान, रायगडच्या पालकमंत्री पदावरून मंत्री आदिती तटकरे आणि मंत्री भरत गोगावले यांच्यातील मतभेद अद्याप मिटलेले नाहीत. जिल्ह्यातील विविध शासकीय कार्यक्रमांचे उद्घाटन, ध्वजारोहणाचा मान किंवा प्रशासकीय उपस्थिती यावरून राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेनेमध्ये वारंवार कुरघोडीचे राजकारण पाहायला मिळत आहे. या वादावर तोडगा काढण्यासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी यापूर्वी मध्यस्थी केली असली, तरी अद्याप ठोस निर्णय होऊ शकलेला नाही.

ध्वजारोहणाचा मान भरत गोगावले यांना मिळाल्यानंतर महायुतीतील राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेनेतील दुरावा कायम राहणार की कमी होणार, याबाबत राजकीय वर्तुळात उत्सुकता आहे. त्याचबरोबर रायगड जिल्ह्याला कायम स्वरूपी पालकमंत्री कधी मिळणार, हा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून, राज्य सरकारकडून यावर लवकरच निर्णय होतो का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## ठाण्यात शवसेनेचं धक्कातंत्र, तर राष्ट्रवादीच्या गोटातही घडामोड



**ठाणे :** ठाणे महापालिका निवडणुकांच्या निकालानंतर आता सत्ता स्थापनेच्या हालचालींना वेग आला आहे. या पार्श्वभूमीवर शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या पालिकेतील गटनेत्यांची बुधवारी निवड करण्यात आली. या पदासाठी शिवसेनेचे पवन कदम आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे नजीब मुल्ला यांना नवनिर्वाचित नगरसेवक आणि नगरसेविकांच्या बैठकीत एकमताने निवडण्यात आले. शिवसेनेच्या नवनिर्वाचित नगरसेवक आणि नगरसेविकांची टेंभीनाका येथील आनंदाश्रम येथे बैठक पार पडली.शिवसेना नगरसेवकांच्या गटनेता निवडीच्या बैठकीत शिवसेनेचे मुख्य नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार शिवसेनेचे नगरसेवक पवन कदम यांची ठाणे महानगरपालिकेच्या गटनेते पदी निवड करण्यात आली. यावेळी खासदार नरेश म्हस्के, माजी आमदार रविंद्र फाटक, ठाणे जिल्हा महिला संघटक मिनाक्षी शिंदे, युवासेना कार्याध्यक्ष पूर्वेश सरनाईक व पदाधिकारी उपस्थित होते.राष्ट्रवादी काँग्रेसच्या नवनिर्वाचित नगरसेवक आणि नगरसेविकांची बैठक ठाण्यात पार पडली. या बैठकीत राष्ट्रवादी काँग्रेसचे नगरसेवक नजीब मुल्ला यांची ठाणे महानगरपालिकेच्या गटनेतेपदी निवड करण्यात आली. यावेळी माजी खासदार आनंद परांजपे, नगरसेवक सुहास देसाई, राजन किणे आणि इतर पदाधिकारी उपस्थित होते.शिवसेनेमधील विविध कार्यक्रम आणि निर्णयाचे केंद्र असलेल्या टेंभीनाका परिसरातून पवन कदम पालिकेवर यंदा निवडून आले आहेत. याआधी पालिकेत स्विकृत नगरसेवक म्हणून कदम यांनी एंट्री घेतली होती. मागील टर्ममध्ये त्यांच्या पत्नी पल्लवी कदम या निवडणुकीत विजयी ठरल्या होत्या. त्यांची उपमहापौरपदी वर्णी लागली होती. शिवसेनेच्या अनेक ज्येष्ठ नगरसेवकांची नावे या पदासाठी चर्चेत असताना कदम यांना ही संधी देत उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या विश्वासू असलेल्यांना संधी देण्याची खेळी या निमित्ताने करण्यात आली आहे.राष्ट्रवादी काँग्रेसचे नजीब मुल्ला यांनी याआधीही पालिकेचे गटनेतेपद भूषवले आहे. त्यांनी महापालिकेत विरोधी पक्षनेत्याची भूमिका बजावताना सत्ताधाऱ्यांना अंगावर घेतले आहे.

## मनसेची साथ सोडून बडा नेता गेला शिवसेनेत

**मुंबई :** मुंबई महापालिका निवडणुकांच्या तोंडावर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेला बालेकिल्ल्यातच धक्क्यावर धक्के बसल्याचे पाहायला मिळाले होते. मनसेचे शिवडी विधानसभा अध्यक्ष आणि मनसे नेते बाळा नांदगावकर यांचे कट्टर समर्थक असलेल्या संतोष नलावडे यांनी जानेवारीच्या सुरुवातीलाच पक्षाला 'जय महाराष्ट्र' केला. महाराष्ट्र सैनिकांना लांबलचक पत्र लिहित संतोष नलावडे यांनी मनातील खदखद व्यक्त केली होती. संतोष धुरी, वीरेंद्र तांडेल यांच्यामागोमाग नलावडेंनीही पक्षाची साथ सोडल्याने शिवडीत खळबळ उडाली होती. नलावडे यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेत प्रवेश केल्यानंतर ठाकरे गटावर शरसंधान साधले आहे.उबाठासोबत युतीमुळे मनसेचे नुकसान झाले. मनसेची फसवणूक झाली, केसाने गळा कापला. घऱ्ब्रत मध्ये मनसेची अखेर खऱ्या शिवसेनेला साथ.२०१७ च्या निवडणुकीत मनसेचे स्वबळावर लढून ७ नगरसेवक निवडून आले होते. त्यापेक्षा यावेळी स्थिती अधिक चांगली होती. परंतु उबाठासोबत युती केल्याने अपेक्षित यश मिळाले नाही. उबाठाने मुळात कमी जागा मनसेला दिल्या. त्यातही निवडून येण्याची खात्री असलेल्या जागा स्वत:कडे ठेऊन पडीक जागा मनसेच्या माथी मारल्या. निवडणुकीत मनसेला मदत केली नाही. मनसेच्या प्रभागातील उबाठाच्या कार्यकर्त्यांना अन्य प्रभागात जाऊन काम करण्याचे आदेश देण्यात आले होते. त्यामुळे मनसेचे उमेदवार एकाकी लढत होते, असा दावा संतोष नलावडे यांनी केला.मनसेची मतं उबाठाला ट्रान्सफर झाली. पण उबाठाची मतं मनसेला ट्रान्सफर झाली नाही. मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी अन्य कशाहीपेक्षा महाराष्ट्र महत्वाचा आहे हे निवडणुकीपूर्वी सांगितले होते. आता त्याच विचाराने महाराष्ट्र व मुंबईच्या विकासासाठी भाजप आणि स्व. बाळासाहेबांच्या विचाराने पुढे जाणाऱ्या खऱ्या शिवसेनेसोबत जावे लागेल.

# शरीर संबंधासाठी हट्ट, शेतकऱ्याला संपवलं; क्राइम शो पाहून 'परफेक्ट प्लॅनिंग पण एक चूक

**छत्रपती संभाजीनगर :** कन्नड तालुक्यातील जामडी फॉरेस्ट शिवारात सापडलेल्या अनोळखी मृतदेहाच्या खुनाचा गुन्हा अखेर उघडकीस आला. या प्रकरणात खून करणाऱ्या महिला व तिच्या अठरा वर्षीय मुलाला ताब्यात घेण्यात आले. क्राईम पेट्रोल, सीआयडी, दृष्यम तसेच मोबाईलवर खुन प्रकरणात असलेल्या पुराव्यांची माहिती घेत, अत्यंत प्लानिंग आणि कोणताही तांत्रिक पुरवा राहणार नाही. अशा पदधतीने हा खुन करण्यात आला. या प्रकरणात वंदना राजू पवार (वय ४५) व धीरज उर्फ टेमा राजू पवार (वय १९, दोघे रा. जामडी फॉरेस्ट शिवार, ता. कन्नड) अशी अटक आरोपींची नावे आहेत. अशी माहिती पोलिस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी अपर पोलिस अधीक्षक अन्नपूर्णा सिंह उपस्थित होत्या.यावेळी पोलिस अधिक्षक डॉ. विनयकुमार राठोड





यांनी दिलेल्या माहितीनुसार, खुनाची घटना ही १३ जानेवारी रोजी उघडकीस आली. पोलिसांनी मृत व्यक्ती हा जामडी गावातील राजु रामचंद्र पवार (रा. जामडी, कन्नड) अशी ओळख पटविली. खुनाच्या घटनेनंतर आरोपींचा शोध पोलिसांनी सुरू केला. यासाठी स्थानिक गुन्हे शाखा, कन्नड ग्रामीण पोलिस, डॉग स्कॉड व फॉरेन्सिक पथक घटनास्थळावरून मारेकऱ्यांचा माग सूरू केला. घटनास्थळी मृताच्या अंगावरील अंडरवेअर, चप्पल व फुटलेला मोबाइल अशी सापडली होती. जंगलाचा भाग असल्यामुळे तांत्रिक पुराव्यांचा अभाव होता. या तपासासाठी स्थानिक गुन्हे शाखेचे दोन पथक तयार करण्यात आले होते.या खुनाचा तपास करण्यासाठी ६० ते ७० संशयीताची पोलिसांनी कसून चौकशी केली. मृतदेह सापडलेल्या ठिकाणा लगतचे शेत राजू जोधा पवार यांचे असून त्याची देखभाल पत्नी वंदना व मुलगा धीरज करत असल्याची माहिती समोर आली. पोलिसांनी या दोघांची चौकशी सुरू केली. या दोघांच्या जबाबात विसंगती आढळली. विसंगती आढळताच वंदना पवार आणि धीरज उर्फ टेमा राजु पवार या दोघांना ताब्यात घेण्यात आली.या प्रकरणात पोलिसांनी वंदना पवार याच्याकडे घटनेची माहिती घेतली असता, तिने सांगितले कि, मृत राजू पवार वारंवार तिच्यावर अनैतिक संबंधासाठी दबाव टाकत होता. या त्रासाला कंटाळली होती. मृत राजु हा आपल्याला त्रास देत आहे. अशी माहिती तिने मुलाला सांगितले व दोघांनी खून करण्याचा कट रचला. १३ जानेवारी रोजी वंदनाने राजू पवार याला शेताजवळ बोलावले. तो कपडे काढत असतानाच धीरजने लाकडी ओंडक्याने डोक्यावर व गुप्तांगावर वार केले. वंदनानेही मदत करत त्याचा जीव घेतला. पुरावे नष्ट करण्यासाठी मृतदेह वनभागातील नाल्यात झाडाच्या मुळाशी पाण्यात अडकवून ठेवण्यात आला.या प्रकरणात स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी वंदना पवार आणि धीरज उर्फ टेमा पवार या दोघांना ताब्यात घेतले. या दोघांना कन्नड पोलिसांच्या हवाली करण्यात आले आहे. ही कारवाई पोलिस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड, अपर अधीक्षक अन्नपूर्णा सिंह, सहायक अधीक्षक अपराजिता अग्रिहोत्री, एलसीबीचे निरीक्षक विजयसिंग राजपूत यांच्यासह एलसीबी व कन्नड ग्रामीण पोलिस ठाण्याच्या अधिकारी-अंमलदारांनी केली.

## महिलेची दवाखान्याच्या आवारात गाडीच प्रसूती, नातेवाईकांचा आरोप

**अमरावती :** खुटिदा गावातील गर्भवती महिलेला प्रसूतीकळा सुरु झाल्यानंतर रात्री प्राथमिक आरोग्य केंद्रात नेण्यात आले. मात्र महिलेवर उपचार करण्याऐवजी तेथील डॉक्टर बेपत्ता झाले. त्यानंतर दवाखान्याच्या आवारात गाडीत बाळाचा जन्म झाला. मेळघाटातील हतरु प्राथमिक आरोग्य केंद्रात ही घटना घडली.खुटिदा गावातील गर्भवती महिला प्रेमंती सतीश बेठेकर हिला १९ जानेवारीच्या रात्री प्रसूतीकळा सुरू झाल्यानंतर कुटुंबीयांनी खासगी वाहनाने तातडीने हतरू प्राथमिक आरोग्य केंद्रात नेले. मात्र, दवाखान्यात पोहोचल्यानंतर तिला उपचार मिळणे दूरच दवाखान्यात भरतीही करुन घेण्यात आले नाही. अखेर दवाखान्याच्या आवारातच उभ्या गाडीत तिची प्रसूती झाली .इतक्या गंभीर परिस्थितीत डॉक्टरांनी येणे अपेक्षित असताना आई व नवजात बाळाची कोणतीही वैद्यकीय तपासणी न करता डॉक्टर दवाखान्यातून बेपत्ता झाल्याचा आरोप नातेवाइकांनी केला आहे .



त्यानंतर प्रेमंती नवजात बाळासह पुन्हा आपल्या गावात परतल्या . सुरक्षित प्रसूती ही प्राथमिक आरोग्य केंद्राची मूलभूत जबाबदारी असताना , असा हलगर्जीपणा कसा काय सहन केला जातो ? असा संतप्त सवाल ग्रामस्थांकडून केला जात आहे.या प्रकाराची तक्रार पीडित महिलेने माजी आमदार राजकुमार पटेल यांच्याकडे केली . त्यानंतर पटेल यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे लेखी तक्रार दाखल करत संबंधित डॉक्टर व कर्मचाऱ्यांवर तत्काळ निलंबनाची कारवाई करण्याची मागणी केली आहे. दरम्यान , जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. प्रवीण पारिसे यांनी घटनेची सखोल चौकशी करण्यासाठी पथक पाठवले जाईल.

## डेटिंग ॲपवर पुण्यातील युवक भुलला, कोंढव्यातील पेट्रोल पंपावर गेला, पण तिथे चौघांनी मिळून..

**पुणे :** डेटिंग ॲपवर झालेल्या ओळखीतून एका तरुणाला बोलावून त्याच्याकडील दागिने आणि रोकड असा सुमारे ८० हजार रुपयांचा ऐवज लुटण्यात आल्याची घटना कोंढवा परिसरात घडली. या प्रकरणी चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी चौघांना अटक करण्यात आली आहे.राहिल अकिल शेख (वय १९, रा. सोमजी, कोंढवा), शाहीद शानूर मोमीन (वय २५, रा. कात्रज), रोहन नईम शेख (वय १९, रा. कोंढवा बु.), इशान निसार शेख (वय २५, रा. कात्रज) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत.याबाबत एका तरुणाने कोंढवा पोलिस ठाण्यात तक्रार दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार २७ वर्षीय तरुण नगर रस्त्यावरील वाघोली परिसरात राहतो. तो ११ जानेवारीला मोबाइलवर एक डेटिंग ॲप पाहत असताना एका अनोळखी व्यक्तीने त्याला मेसेज पाठविला. त्यानंतर तक्रारदाराने त्या व्यक्तीच्या मोबाइलवर



संपर्क साधला.कोठे राहतो,' अशी विचारणा आरोपीने केली. यानंतर आरोपीने रात्री नऊच्या सुमारास कोंढव्यातील शीतल पेट्रोल पंपाजवळ भेटायला बोलावले. तेथे तीन तरुण थांबले होते. त्यांनी तक्रारदाराला धारदार हत्याराचा धाक दाखविला. त्यानंतर कोंढव्यातील पानसरेनगर परिसरातील मोकळ्या जागेत त्याला नेले. तेथे त्याला शिवीगाळ करून लाथाबुक्क्यांनी मारहाण करण्यात आली.आरोपींनी त्याच्याकडील मोबाइल आणि अंगठी काढून घेतली; तसेच धमकावून एटीएममधून पैसे काढण्यास भाग पाडले. तक्रारदाराकडील एकूण सुमारे ८० हजार रुपयांचा ऐवज लुटण्यात आला. या घटनेची वाच्यता केल्यास जीवे मारण्याची धमकी देऊन आरोपी पसार झाले होते. पोलिसांनी तपास करून आरोपींना अटक केली.

## वर्दीतला ड्रग्ज माफिया ! मुद्देमालात मैदा भरून १० किलो ड्रग्ज लंपास

**अहिल्यानगर :** रक्षकच भक्षक बनला', या म्हणीचा प्रत्यय देणारा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. नगर जिल्हा पोलीस दलाच्या स्थानिक गुन्हे शाखेत कार्यरत असणारा शामसुंदर विश्वनाथ गुजर (बक्कल नं. २२०५) हा खाकी वर्दीतला ड्रग्ज माफिया असल्याचं उघड झालं असून, पुणे पोलिसांनी पहाटे चार वाजता त्याला अटक करत संपूर्ण पोलीस यंत्रणेलाच हादरवून सोडलं आहे.नगर पोलिसांनी जप्त केलेल्या तब्बल २५ किलो मेफेड्रोन (एमडी) या मुद्देमालातून १० किलो एमडी परस्पर चोरून त्याऐवजी मैदा भरल्याची कबुली स्वतः शाम गुजरने दिली आहे. या १० किलो एमडीची बाजारभावात किंमत जवळपास २५ कोटी रुपये आहे. यातील १ किलो एमडी शिरूरमध्ये विक्री करताना



पकडण्यात आला, मात्र उर्वरित ९ किलो एमडी कुठे गेले? कोणाच्या घशात गेले? हा प्रश्न अजूनही अनुत्तरित आहे.पुणे ग्रामीण पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखा व शिरूर पोलिसांच्या संयुक्त कारवाईत गॅरेज चालक शादाब रियाज शेख (वय ४१) याला १ किलो ५२ ग्रॅम एमडीसह अटक करण्यात आली. चौकशीत हा एमडी थेट नगर एलसीबीतील शाम गुजरने पुरविल्याचं स्पष्ट झालं आणि पोलीस खात्यात खळबळ उडाली.हा सगळा मुद्देमाल पोलीस अधीक्षक व गुन्हे शाखेच्या निरीक्षकांच्या कस्टडीत, कडेकोट बंदोबस्तात ठेवलेला होता. तरीही गुजर आत शिरला कसा? १० किलो एमडी बाहेर काढताना कुणाचीच नजर कशी पडली नाही? मैदा मिक्स करून ठेवल्यावरही तपास कसा नाही झाला? शिरूरपर्यंत एवढा मोठा मुद्देमाल पोहोचतोच कसा? हे एकट्या गुजरचे धाडस आहे की वरच्या आशीर्वादाने घडलेला काळा खेळ? हा सवाल आता थेट वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या दारात जाऊन उभा राहिला आहेपारनेर पोलीस ठाण्यात असताना मावा-गुटखा तस्करांशी संबंध, अवैध धंद्यांच्या तक्रारी, बदलीसाठी निवेदने तरीही वादग्रस्त गुजरला एलसीबीसारख्या संवेदनशील शाखेत पोस्टिंग देण्यात आली. याच बक्षिसीचा गैरफायदा घेत त्याने थेट २५ कोटींच्या एमडीवर डल्ला मारला.पुणे स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने येथील स्थानिक गुन्हे शाखेतील हवालदारास अटक केली. अमली पदार्थ तस्करी प्रकरणी अटक करण्यात आल्याचे सांगण्यात आले आहे. या कारवाईची दखल घेऊन हवालदार श्यामसुंदर गुजर याला निलंबित करण्याची कारवाई प्रस्तावित करण्यात आली आहे. पुणे पोलिसांत तपासात काय माहिती समोर येते, त्यानुसार पुढील कारवाई करण्यात येईल.

# टीम इंडियाने उडवला न्यूझीलंडचा धुव्वा

## पहिल्या टी-२० सामन्यात भारताचा ४८ धावांनी विजय; अभिषेकची ८४ धावांची खेळी







**नागपूर/वृत्तसंस्था :** न्यूझीलंडविरुद्ध पहिल्याच टी २० सामन्यात भारताने ४८ धावांनी दणदणीत विजय मिळवला. अष्टपैलू कामगिरीच्या जोरावर किवींना धूळ चारत टीम इंडियाने मालिकेत १-० अशी आघाडी घेतली. प्रथम फलंदाजी मिळाल्यावर २० षटकांत भारताने ७ गडी गमावून २३८ धावांचा डोंगर उभा केला. ही न्यूझीलंडविरुद्ध टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील भारताची आतापर्यंतची सर्वोच्च धावसंख्या आहे. विजयी लक्ष्याचा पाठलाग करताना किवीज संघाला मात्र ७ बाद १९० धावापर्यंत मजल मारता आली. उभय संघातील दुसरा सामना दि. २३ रोजी रायपूर येथे होईल.

२३९ धावांच्या विशाल लक्ष्याचा पाठलाग करताना न्यूझीलंडने जोरदार प्रयत्न केले. ग्लेन फिलिप्सने धमाकेदार खेळी करताना ४० चेंडूत ४ चौकार आणि ६ षटकरासह सर्वाधिक ७८ धावा केल्या. पण, तो १४ व्या षटकात बाद झाला. तो सोडला, तर बाकी कोणताही खेळाडू फार काळ तग धरू शकला नाही. ज्यामुळे किवी फलंदाजांना निर्धारित षटकांत केवळ १९० धावांपर्यंतच मजल मारता आली. न्यूझीलंडने शेवटपर्यंत संघर्ष केला, पण वाढत्या धावगतीच्या दबावामुळे त्यांना ४८ धावांनी पराभव स्वीकारावा लागला. चॅपम नने ३९, डॅरिल मिचेलने २८ तर सँटनरने नाबाद २० धावा केल्या.

न्यूझीलंडने नाणेफेक जिंकून भारताला प्रथम फलंदाजीसाठी बोलावले होते. भारताकडून अभिषेक शर्मा आणि संजू सॅमसन यांनी डावाची सुरुवात केली. सॅम सनने आक्रमक सुरुवात केली होती. पण तो दुसऱ्या षटकात ७ चेंडूत १० धावा करून बाद झाला. दोन वर्षांनी पुनरागमन करणारा इशान किशन तिसऱ्या क्रमांकावर मैदानात उतरला. त्याने पहिल्याच चेंडूवर चौकार मारत इरादा स्पष्ट केला होता. पण आक्रमक खेळण्याच्या प्रयत्नात जेकब डफफीने त्याला ८ धावांवर मार्क चॅपमनच्या हातून झेलबाद केले. २७ धावांत २ विकेट गमावल्यानंतर कर्णधार सूर्यकुमार यादवने अभिषेकची चांगली साथ दिली. एका बाजूने अभिषेक आक्रमक खेळत असताना दुसरी बाजू सूर्यकुमारने सांभाळली होती. सूर्यानेही काही चांगले शॉट्स खेळले. यादरम्यान अभिषेकने २२ चेंडूतच त्याचे अर्धशतक पूर्ण केले. हे त्याचे ७ वे आंतरराष्ट्रीय अर्धशतक होते. अभिषेक आणि सूर्यकुमार या दोघांनी ९९ धावांची भागीदारी केली. मात्र सँटनरने ११ व्या षटकात सूर्यकुमारला बाद केले. त्याने २२ चेंडूत ४ चौकार आणि १ षटकारासह ३२ धावा केल्या. यानंतर शतकाच्या दिशेने वाटचाल करत असलेला अभिषेक आक्रमक शॉट मारण्याच्या प्रयत्नात १२ व्या षटकाच्या शेवटच्या चेंडूवर काईल जेमि सनच्या हातात झेल देत बाद झाला. त्याने ३५ चेंडूत ५ चौकार आणि ८ षटकारांसह ८४ धावा तडकावल्या. अभिषेक बाद झाल्यानंतर हार्दिक पंड्याने २५ धावांचे योगदान दिले तर शिवम दुबे ९ धावा करत माघारी परतला. यानंतर नंतर रिंकू सिंगने जबाबदारी हाती घेतली. त्याने २० चेंडूत ४ चौकार आणि ३ षटकारांसह नाबाद ४४ धावा झोडपल्या. यामुळे भारताने २० षटकांत ७ बाद २३८ धावांचा डोंगर उभा केला. अर्शदीप ६ धावांवर नाबाद राहिला.

■ अभिषेकने या खेळीदरम्यान युवराज सिंगचा विक्रम मोडला. अभिषेकने युवराजला टी-२० मधील षटकारांबाबत मागे टाकले. युवराजला मागे टाकण्यासाठी अभिषेकला या सामन्याआधी २ षटकारांची गरज होती. अभिषेकने ३५ चेंडूत ५ चौकार आणि ८ षटकार लगावले. यासह अभिषेकने युवराजला टी-२० सिक्सबाबत मागे टाकले. आता त्याच्या नावे ८३ षटकारांची नोंद आहे. तर युवराजने ५८ सामन्यांमध्ये ७४ षटकार लगावले होते. याशिवाय, अभिषेक न्यूझीलंडविरुद्ध एकाच टी-२० सामन्यात ८ किंवा त्यापेक्षा अधिक षटकार मारणारा जगातील तिसरा, तर भारताचा पहिलाच खेळाडू ठरला आहे. याआधी रिचर्ड लेवी आणि कायरन पोलार्ड यांनी असा पराक्रम केला आहे. रिचर्डने २०१२ मध्ये हॅमिल्टनला झालेल्या सामन्यात न्यूझीलंडविरुद्ध १३ षटकार मारले होते. पोलार्डने २०२० मध्ये न्यूझीलंडविरुद्ध टी-२० सामन्यात ८ षटकार मारले होते.

## बीसीसीआयला आयपीएलसाठी २७० कोटी रुपयांचा प्रायोजकत्व करार




**दिल्ली :** बीसीसीआयने २०२६ च्या इंडियन प्रीमियर लीगपूर्वी गुगलच्या जेमिनी या एआय (आर्टिफिशियल इंटेलिजन्स) प्लॅटफफॉर्मकडून २७० कोटी रुपयांचा आकर्षक प्रायोजकत्व करार मिळवला आहे.

जेमिनीचा प्रतिस्पर्धी चॅटजीपीटी सध्या सुरू असलेल्या महिला प्रीमियर लीगच्या प्रायोजकांपैकी एक आहे. हा करार तीन वर्षांसाठी आहे आणि तो आयपीएलच्या जागतिक आकर्षणाला अधिक बळकटी देतो, असे बीसीसीआयच्या एका अधिकाऱ्याने सांगितले. गेल्या वर्षी जेंव्हा भारत सरकारने ड्रीम-११ सारख्या रिअल मनी गेमिंग प्लॅटफफॉर्मवर बंदी घातली, तेंव्हा बीसीसीआयला नवीन जर्सी प्रायोजक शोधावा लागला होता. अखेरीस, अपोलो टायर्सने ड्रीम ११ ची जागा घेतली आणि ५७९ कोटी रुपयांना जर्सी प्रायोजकत्वाचे हक्क मिळवले. टाटा समुहाकडे जगातील सर्वात मोठी टी-२० लीग असलेल्या आयपीएलचे शीर्षक प्रायोजकत्वाचे हक्क आहेत. जेमिनीसोबतचा हा नवीनतम प्रायोजकत्व करार भारतीय क्रिकेटम धील एआय प्लॅटफफॉर्मची वाढती आवड दर्शवतो. गेल्या नोव्हेंबरमध्ये जेंव्हा डब्ल्यूपीएलसोबत चॅटजीपीटीच्या संबंधाची घोषणा झाली होती, तेंव्हा बीसीसीआयचे सचिव देवजित सायकिया यांनी या भागीदारीच्या महत्त्वाविषयी सांगितले होते. 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स, उत्पादन आणि पेय पदार्थांम धील जागतिक कंपन्यांपासून ते विश्वासार्ह भारतीय ग्राहक ब्रँड्सपर्यंत, या भागीदारीचे मिश्रण चाहत्यांच्या अनुभवाला आकार देण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावेल.

## साबालेन्का, अल्कारेझ, स्विटोलिनाची आगेकूच

### कोको गॉफ, व्हेरेव्ह, रुबलेव्ह, मेदवेदेव्हही तिसऱ्या फेरीत, राडुकानू पराभूत

**मेलबर्न/वृत्तसंस्था :** स्पेनचा २२ वर्षीय टेनिसपटू कार्लोस अल्कारेझ, रशियाचा डॅनील मेदवेदेव्ह, बेलारुसची आर्यना साबालेन्का, अमेरिकेची कोको गॉफ, अलेजान्ड्रो डेव्हिडोविच फोकिना, कॅनडाची किशोरवयीन व्हिक्टोरिया एम्बोको, रशियाचा आंद्रे रुबलेव्ह, अलेक्झांडर व्हेरेव्ह, एलिना स्विटोलिना यांनी ऑस्ट्रेलिया ओपन ग्रँडस्लॅम टेनिस स्पर्धेत तिसरी फेरी गाठली तर ब्रिटनच्या एम्मा राडुकानूला पराभवाचा धक्का बसला. चौथ्या दिवशीही प्रेक्षकांनी विक्रमी गर्दी केली होती.



जागतिक अग्रमानांकित कार्लोस अल्कारेझने जर्मनीच्या ३४ वर्षीय यानिक हन्फमनवर ७-६ (७-४) ६-३, ६-२ असा पराभव केला. पहिल्या सेटमध्ये सुरुवातीला अल्कारेझ १-३ असा मागे पडला होता. पण नंतर त्याने हळूहळू पकड मिळिवत ७९ मिनिटे चाललेला पहिला गेम जिंकला आणि नंतरचे दोन सेट्स सहज जिंकत तिसरी फेरी गाठली. या स्पर्धेत अल्कारेझला आजवर उपांत्यपूर्व फेरीच्या पुढे मजल मारता आलेली नाही. त्याची पुढील लढत फ्रान्सच्या कोरेन्टिन मुटेटविरुद्ध होईल. या स्पर्धेची तीनवेळा अंतिम फेरी गाठलेल्या रशियाच्या मेदवेदेव्हला विजय मिळिवण्यासाठी चार सेट्सचा संघर्ष करावा लागला. फ्रान्सच्या क्वेनिटन हॅलीसवर त्याने ६-७ (७-९), ६-३, ६-४, ६-२ अशी मात केली.


पुरुष एकेरीच्या अन्य सामन्यांत १३ व्या मानांकित आंद्रे रुबलेव्हने जेमी फारियाचा ६-४, ६-३, ४-६, ७-५, १९ व्या मानांकित टॉमी पॉलने थियागो ऑगस्टिन तिरान्टचा ६-३, ६-४, ६-२, अलेक्झांडर बुबलिक, लीयर्नर तिएन, कॅमेरॉन नोरी यांनीही आगेकूच केली. डेव्हिडोविच फोकिनाने पाच सेट्सच्या झुंजीत अमेरिकेच्या रीली ओपेल्कावर ६-३, ७-६ (७-३), ५-७, ४-६, ६-४ अशी मात केली. जर्मनीच्या अलेक्झांडर व्हेरेव्हने आगेकूच करताना पावसाचा अडथळा बाजूला सारत अलेक्झांडर मुलेरवर ६-३, ४-६, ६-३, ६-४ अशी मात केली. ऑस्ट्रेलियाच्या ॲलेक्स डी मिनॉरने हमद मेदेडोविचला ६-७ (५-७), ६-२, ६-२, ६-१ असे हरविले. त्याची पुढील लढत फ्रान्सेस टायफोशी होईल. टायफोने फ्रान्सिस्को कॉमेसानाचा ६-४, ६-३, ४-६, ६-२ असा पराभव केला.


महिला एकेरीत जागतिक अग्रमानांकित आर्यना साबालेन्काने चीनच्या बाय झुओझुआनचा ६-३, ६-१ असा पराभव केला. साबालेन्काने २०२३ व २०२४ मध्ये ही स्पर्धा जिंकली होती तर मागील वर्षी ती उपविजेती ठरली होती. तिची पुढील लढत ॲनास्तेसिया पोटापोव्हाशी होईल. पोटापोव्हाने माजी अमेरिकन ओपन चॅम्पियन एम्मा राडुकानूला ७-६ (७-३), ६-२ असा पराभवाचा धक्का दिला. तिसऱ्या मानांकित कोको गॉफने सर्बियाच्या ओल्गा डॅनिलोविचचा ६-२, ६-२ असा पराभव करून तिसरी फेरी गाठली. तिची लढत तिचीच देशवासी हेली बाप्टिस्टशी होईल. युवा खेळाडू मायरा ॲन्ड्रीव्हा, व्हिक्टोरिया एम्बोको व इव्हा जोविच यांनी ही तिसरी फेरी गाठली. एम्बोकोने अमेरिकेच्या कॅटी मॅकनालीचा ६-४, ६-३ असा पराभव केल तर १२ व्या मानांकित एलिना स्विटोलिनाने लिन्डा क्लिमोविकोव्हावर ७-५, ६-१ अशी मात केली.

# प्रेमाचे सात टप्पे अनब नॉस्टॅल्जिया...

## मालिका संपल्यानंतर स्टार प्रवाहचा नायक अनोख्या प्रयोगातून जिंकतोय मन

**मुंबई :** नव्वदीच्या दशकातली अनेक गाणी आजही अनेकांच्या मनात घर करून आहेत, मात्र आजच्या डिजिटल युगात, रील्स आणि शॉर्ट फॉरमॅटच्या गर्दीत, त्या भावनांची खोली कुठेतरी हरवतेय. हाच हरवलेला नॉस्टॅल्जिया पुन्हा जिवंत करण्याचा प्रयत्न अभिनेता-गायक समीर परांजपे त्याच्या 'सेव्हन स्टेजेस ऑफ लव्ह' या नव्या म्युझिक सीरिजमधून करत आहे.या सीरिजविषयी समीर म्हणाला, 'मला सर्वसाधारण 'कव्हर साँग' करायचं नव्हतं. विशिष्ट संकल्पनेवर आधारित अर्थपूर्ण असं गाणं करण्याची माझी इच्छा होती. प्रेमाचे सात टप्पे ही संकल्पना डोक्यात आली आणि त्यावर काम करायला सुरुवात केली. प्रेमाच्या सात टप्प्यांवर आधारित ही सीरिज म्हणजे





केवळ गाण्यांची मालिका नाही; तर तो एक भावनिक प्रवास आहे. प्रत्येक टप्प्याच्या अवस्थेचं प्रतिनिधित्व करणारं विशिष्ट गाणं असतं. मी या संकल्पनेविषयी सोशल मीडियावर वाचलं होतं. 'थोडं तुझं आणि थोडं माझं' ही माझी मालिका सुरू असताना सहकलाकार शिवानी सुर्वे हिला त्या संकल्पनेवर गाणी ऐकायला आवडेल का, असं विचारलं असता, 'चांगली संकल्पना आहे. सगळ्यांना ऐकायला आवडेल' असं ती म्हणाली. तिच्या प्रतिसादामुळे मला अधिकच हुरूप आला'. प्रेमाचे सात टप्पे आणि त्याला अनुसरून असलेली गाणी याबद्दल समीरनं सांगितलं, 'पहिली पायरी 'दिलकशी. पहिल्यांदा कुणाला तरी पाहून मन हरवणं. त्यासाठी 'होशवालों को खबर क्या' हे गाणं निवडलं. आकर्षण आणि कनेक्शन या दुसऱ्या टप्प्यासाठी 'आफरीन' हे गाणं आहे. तिसरी पायरी-'इश्क'; याचं प्रतिनिधित्व करण्यासाठी 'तू है तो दिल धडकता है' या गाण्याची निवड केली. 'आकिदत' या चौथ्या टप्प्यासाठी 'लाल इश्क' हे गाणं आहे. पाचव्या 'इबादत' या पायरीसाठी 'तूझ मैं रब दिखता है' हे गाणं अगदी योग्य ठरतं. सहावी पायरी - 'जुनून'; यासाठी 'तू ही रे' हे लोकप्रिय गाणं आणि शेवटचा टप्पा म्हणजे 'मौत' यासाठी 'रंजिश ही सही' हे गाणं निवडलं. ही सगळी गाणी हिंदीतली लोकप्रिय गाणी असली, तरी त्यांची मांडणी पूर्णपणे नवी आहे.'समीर म्हणाला, 'पहिल्याच गाण्याला मिळालेला प्रतिसाद भारावून टाकणारा आहे. त्या गाण्यांना जेन झींची अधिक पसंती मिळतेय. तरुण मंडळी त्या गाण्यांकडे पुन्हा वळतेय. दर चार-पाच दिवसांनी एक गाणं अशा पद्धतीनं ही सात गाण्यांची सीरिज भेटीला येणार आहे. ही सीरिज म्हणजे जुन्या आठवणी जपणाऱ्यांसाठी नॉस्टॅल्जिया आणि नव्या पिढीसाठी ताजेपणा असा दोघांनाही जोडणारा सेतू ठरणार आहे.'

# मनाने मी तिच्याशी कधीच लग्न केलंय फक्त..

**मुंबई :** आमिर खान आणि गौरी स्प्राट यांचे नाते आता सर्वज्ञात आहे. ते बऱ्याच काळापासून एकमेकांना डेट करत आहेत. दोघेही आता मुंबईत नवीन एका आलिशान घरात राहायला गेले आहेत, हे घर आमिरच्या कुटुंबाच्या घरापासून फार दूर नाही. अभिनेत्याने अलीकडेच सांगितले की तो गौरीसोबतच्या त्याच्या या नात्याबद्दल खूप गंभीर आहे. मनाने त्याने आधीच गौरीशी लग्न केले असून तो तिला आपली पत्नीच मानतो असंही आमिर म्हणाला. पण प्रत्यक्षात लग्न करण्याचा त्याचा अद्याप विचार नाही असे त्याने कबुल केले. आमिर खानने बॉलीवूड हंगामाला सांगितले की, 'ही सगळी शिफ्टिंग माझ्या हॅप्पी पटेल या सिनेमाच्या रिलीजदरम्यानच होतेय त्यामुळे हे सगळं वेडसरपणासारखं आहे.गौरी स्प्राटसोबतच्या त्याच्या नात्याबद्दल आमिर म्हणाला, 'गौरी आणि मी एकमेकांबद्दल खूप गंभीर आहोत आणि आमचे नाते खूप घट्ट आहे. आम्ही जोडीदार आहोत, आम्ही एकत्र आहोत. लग्नाबद्दल बोलायचे झाले तर, मी तिच्याशी मनाने आधीच लग्न केले आहे. त्यामुळे ते औपचारिक करायचे की नाही हे मी कालांतराने ठरवेन.'गौरी एका ६ वर्षांच्या मुलाची आई आहे. गेल्या वर्षी आमिर खानच्या ६० व्या वाढदिवशी



त्याने गौरीची ओळख माध्यमांशी करून दिली. त्याने खुलासा केला की ते गेली २५ वर्षांपासून एकमेकांना ओळखत होते, पण दीड वर्षापूर्वी ते पुन्हा भेटले. गौरी एका ६ वर्षांच्या मुलाची आई आहे. तिने स्पष्ट केले की ती एका सौम्य आणि बुद्धिमान जीवनसाथीच्या शोधात होती आणि तिला आमिरमध्ये हे गुण आढळले. गौरी आता आमिरच्या प्रॉडक्शन हाऊसमध्ये काम करते.आमिर खानचे पहिले लग्न १९८६ मध्ये रीना दत्तासोबत झाले होते. त्यांना आयरा खान आणि जुनैद खान ही दोन मुले आहेत. आमिर आणि रीना यांचा २००२ मध्ये घटस्फोट झाला. २००५ मध्ये आमिरने चित्रपट निर्माती किरण रावशी लग्न केले आणि २०२१ मध्ये त्यांनी वेगळे होण्याची घोषणा केली. त्यांना एक मुलगा आझाद देखील आहे, जो सरोगसीद्वारे जन्माला आला होता. आमिरचे तिसरे प्रेम प्रकरण सुरू असूनही दोन्ही एक्स पत्नींशी त्याचे चांगले संबंध आहेत.

# 'तिघी' चित्रपट ६ मार्चला झळकणार

**पुणे :** मराठी चित्रपटसृष्टीत नात्यांच्या हळुवार धाग्यांनी विणलेला एक हृदयसपर्शी चित्रपट लवकरच प्रदर्शित होणार आहे. सुप्री मीडिया प्रस्तुत आणि कोक्लिको यांचा 'तिघी' हा चित्रपट ६ मार्च रोजी प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटात तीन दिग्गज अभिनेत्रींच्या अभिनयाची जुगलबंदी पहायला मिळणार आहे. या चित्रपटाचे पोस्टर नुकतेच प्रदर्शित झाले आहे.

तिघी हा चित्रपट प्रामुख्याने आई आणि मुलींच्या नात्यातील अनोखी गुंतागुंत आणि न व्यक्त केलेल्या भावनांच्या प्रवासावर भाष्य करणार आहे. यात जीवनातील अनेक क्षण असे असतात, जिथे भावना मनात दडलेल्या राहतात. 'तिघी' ही कथा याच न सांगितलेल्या भावना, आठवणी आणि काही अंतर्मुख करणाऱ्या क्षणांवर आधारित आहे. या चित्रपटाचे मध्यवर्ती कथानक तिघींच्या जगण्यातलं चौथं पान उलगडते. या तीन महत्त्वपूर्ण महिलांच्या आयुष्याकडे पाहण्याचा दृष्टीकोन, त्यांचे बदलत्या काळातील भावनिक चढ-उतार आणि त्यांच्यातील खास नात्याचा सुंदर वेध दिग्दर्शिका जीजिविषा काळे यांनी घेण्याचा प्रयत्न केला आहे.

या चित्रपटात ज्येष्ठ अभिनेत्री भारती आचरेकर, नेहा पेंडसे आणि सोनाली कुलकर्णी यांचा अभिनय पाहता येणार आहे.

# रीया सेन दुबईमध्ये रिअल इस्टेट क्वीन, सांभाळतेय कोट्यवधींचा बिझनेस..!



**मुंबई :** गेल्या काही वर्षात बॉलिवूडमधल्या बऱ्याच सेलिब्रिटींनी रिअल इस्टेट क्षेत्रात करिअर बनवल्याचं पाहायला मिळालं आहे. विवेक ऑबेरॉयनं दुबईत मोठी रिअल इस्टेट कंपनी सुरू केल्यानंतर आता एक अभिनेत्रीही या व्यवसायात उतरली आहे. फक्त उतरलीच नाही तर ती या दुबईत रिअल इस्टेट क्वीन म्हणून नाव मिळवत आहे.धूम', 'हंगामा' आणि 'गोलमाल' यांसारख्या सुपरहिट चित्रपटांमधून प्रेक्षकांच्या मनावर राज्य करणारी अभिनेत्री रिमी सेन सध्या एका वेगळ्याच कारणामुळं चर्चेत आहे. ग्लॅमरस दुनियेपासून दूर गेलेली रिमी आता दुबईमध्ये एक यशस्वी रिअल इस्टेट व्यावसायिक म्हणून आपली नवी ओळख निर्माण करत आहे.२००० च्या सुरुवाताली रिमी सेन हे नाव बॉलिवूडमध्ये अत्यंत लोकप्रिय होतं. सलमान खान, अजय देवगण आणि अक्षय खन्ना यांसारख्या दिग्गज कलाकारांसोबत



तिनं काम केलं आहे. मात्र, गेल्या काही वर्षांपासून ती मोठ्या पडद्यावरून गायब होती. नुकत्याच समोर आलेल्या माहितीनुसार, रिमीनं अभिनयाला पूर्णपणे रामराम ठोकला असून ती आता दुबईतील मालमत्ता व्यवसायात पूर्णवेळ सक्रिय झाली आहे.नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत रिमीनं या बदलामागचं कारण स्पष्ट केलं. तिनं दुबईतील शिस्तबद्ध प्रणालीचं कौतुक करताना म्हटलं की, दुबई हे शहर सर्वांचे मनापासून स्वागत करतं. येथील ९५% लोक परदेशी असून प्रत्येकासाठी इथं एक सुनियोजित व्यवस्था आहे. भारतात व्यावसायिक धोरणं सतत बदलत असतात आणि कर प्रणालीमध्ये खूप गुंतागुंत आहे. दुबईत काम करणं अधिक सोपं आणि पारदर्शक आहे.

तर रिमीनं यावेळी भारत आणि दुबईतील व्यावसायिक दृष्टिकोनातील फरकही मांडला. ती म्हणाली की, दुबईत रिअल इस्टेट एजंटला 'फायनान्शिअल कन्सल्टंट' सारखा मान दिला जातो. याउलट भारतात जेव्हा एखादा एजंट त्याचं ब्रोकरेज मागतो, तेव्हा लोक त्याच्याकडं गुन्हेगारासारखं पाहतात. याच कारणामुळं तिनं व्यवसायासाठी दुबईला पसंती दिली. दरम्यान, काही दिवसांपूर्वी रिमीचे नवीन फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाले होते, ज्यामध्ये ती ओळखूही येत नव्हती. त्यामुळं तिनं प्लास्टिक सर्जरी केल्याच्या चर्चांना उधाण आलं होतं.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# नगरसेवक सुनील सपकाळ यांचा तुकोबाराय शेतकरी गटाकडून सन्मान...

## सपकाळ गुरुजींनी राजकीय चारित्र्य जोपासण्याचे काम केले...नंदुआप्पा बोरबळे !

**जनसंचलन/ बुलढाणा**

राजकारणात विरोधकांना वैरी समजण्याचा काळ सुरू आहे. अशा वेळी इतरांच्या भावनांचा आदर करून प्रामाणिकते बरोबर साधेपणा जोपासणारे नगरसेवक सुनील सपकाळ खरी राजकीय संस्कृती जोपासत आहे. राजकीय चारित्र्य जोपासणारे ते सच्चे शिलेदार असल्याचे सामाजिक कार्यकर्ते व ग्रामपंचायत सदस्य नंदू आप्पा बोरबळे म्हणाले.केळवद येथे तुकोबाराय शेतकरी गटाच्या वतीने नगरसेवक झाल्याबद्दल सुनील सपकाळ यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमास अतिथी म्हणून जेष्ठ पत्रकार संजय मोहिते,गणेश निकम, संदीप वानखेडे, बस्सी सर यांची उपस्थिती लाभली. सर्वप्रथम बुलढाणा नगरपालिकेमध्ये स्वीकृत सदस्य पदी निवड झाल्याबद्दल तुकोबाराय शेतकरी गटाच्या वतीने गोपाल वाघमारे, श्रीकृष्ण गवते, मनोज उन्हाले ,निलेश पाकारे, डॉक्टर आकाश सदावर्ते यांनी शाल श्रीफळ, पुष्पगुच्छ सोबतच वैचारिक पुस्तकांची भेट देऊन नगरसेवक सुनील सपकाळ यांचा गौरव केला.



पुढे बोलताना आप्पाजी म्हणाले,राजकारण बहु आयामी आहे. कोणतीही विचारधारा असो किमान इतरांचा आदर करता आला पाहिजे. ही बेसिक पात्रता व अपेक्षा झाली.आजच्या राजकीय संस्कृतीवर नजर टाकली तर मोठी निराशा होते.राज्याला मोठी राजकीय संस्कृती आहे याच स्मरण करून द्यावे लागते.अशा वेळी नगरसेवक सुनील सपकाळ आशेचा किरण ठरतात. इतरांच्या भावनांचा आदर त्यांनी नेहमीच केला आहे.वैचारिक भूमिका हा त्यांच्या राजकारणाचा पाया राहिला. राजकीय चारित्र्य जोपासणारे गुरुजी त्यामुळे वेगळे ठरतात असे ते म्हणाले.तर हृदयापासून झालेला सन्मान माझ्यासाठी मोठा असल्याचे सत्कारमूर्ती नगरसेवक सुनील सपकाळ म्हणाले.मातीशी ईमान राखत कळ्या आईच्या साक्षीने केळवद वासियांनी केलेल्या सत्काराबद्दल त्यांनी ऋण व्यक्त केले.यावेळी जेस्ट पत्रकार संजय मोहिते,गणेश निकम,संदीप वानखेडे यांनी विचार व्यक्त केले.संचलन कैलास महामुने, आभार गोपाल वाघमारे यांनी मानले.या वेळी केळवद ग्रामस्थांची मोठी उपस्थिती लाभली. गेल्या पंचवीस वर्षापासून सामाजिक क्षेत्रामध्ये कार्यरत असून राजकीय पदांपासून दूर राहिलेले सुनील सपकाळ यांना आमदार संजय गायकवाड यांनी राजकारणात स्टँड दिला. हिऱ्याची पारख करावी तसे त्यांनी अलगत त्यांना राजकीय मुख्य प्रवाहात आणले. एक प्रकारे सोनाराने हिऱ्याची पारखच केली आहे. भल्या माणसाला सक्रिय केल्याबद्दल त्यांचे आभार मानले.

# तेलंगाना मध्ये एकनिष्ठा फाऊंडेशन रक्तवीर राष्ट्रीय पुरस्कार २०२६ नी सम्मानीत...



**जनसंचलन/ खामगांव**

जिंदगी फाउंडेशन व थैलीसिमिया सिकलसेल सोसायटी बंकटलाल भवन यांच्या संयुक्त विद्यमाने पुलिस अकॅडमी राघवेंद्र कालीन शिवराम पल्ली तेलंगाना येथे राष्ट्रीय सम्मान सोहळा व रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. सर्व प्रथम सुरजभैय्या यादव, प्रदीप शमी, चेतन कदम, अकील खान, ब्रजेश सिंग यांनी थैलीसिमिया मेजर आजार ग्रस्त पिडीत रुग्णासाठी रक्तदान केले. या सम्मान सोहळ्यात व तसेच रक्तदान शिबिरात महाराष्ट्र राज्यातून खामगांव बुलढाणा जिल्ह्यातील नामांकीत संस्था एकनिष्ठा गौ सेवा रक्तसेवा फाउंडेशनच्या रक्तविरांसह देश विदेशातून आलेल्या ३८९ रक्तदात्यांनी सहभाग घेऊन थैलीसिमिया सिकलसेल रुग्णांसाठी स्वयंफुर्तीने रक्तदान केले. हा रक्तसाठा रुग्णांना नि:शुल्क देण्यात येणार आहे कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे कारगिल युद्ध नायक आपले दोन्ही पाय व उजवा हात भारत देशाच्या रक्षणार्थ सिमेंवर दुश्मनाशी लढतांनी कारगिल युद्धात गमावलेले खरे नायक मा. श्री.दिप चंद यांच्यासह श्रीमती झान्सी चिंथकायला , समाजसेवी प्रेम कच्छावा, कैलास प्रजापती आदि मान्यवरांनी मागील तेरा वर्षा पासून निरंतर योगदान देत नि:स्वार्थ सेवा करत असलेल्या एकनिष्ठा फाउंडेशन संस्थापक अध्यक्ष सुरजभैय्या यादव, सल्लागार अजय वेरूळकर , शहराध्यक्ष प्रदीप शमी, शहर सचिव चेतन कदम, सदस्य अकील खान यांना रक्तवीर स्मृती चिन्ह प्रमाणपत्र दुपट्टा राष्ट्रीय रक्तवीर पुरस्कार देऊन सम्मानीत केले व तसेच पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा दिल्या एकनिष्ठा फाउंडेशनचे सर्वत्र कौतुक होत आहे. अशी माहिती धनंजय गौतमारे यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली.

# मानसी नारखेडे अनेक पुरस्काराने सन्मानित

**जनसंचलन/बुलढाणा**

शिक्षण समिती द्वारा संचालित स्व बबनराव देशपांडे विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय मोताळा येथे दि १७ जानेवारी रोजी पालक मेळावा तसेच गुणवंत विद्यार्थीचा सत्काराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विशेष प्राविन्य मिळवलेल्या सन २०२५ च्या विद्यार्थ्यांना सन्मानीत करण्यात आले.

या वेळी मोताळा येथिल वैषाली ड्रेसेस चे संचालक प्रशांत नारखेडे यांची कन्या कु मानसी नारखेडे हिने इयत्ता १० वि मधे विविध प्राविण्य मिळविले त्या बद्दल तिला ऐकून ६ प्रोत्साहनपर बक्षीस देण्यात आले. यामध्ये ती शाळेमधून प्रथम, मोताळा येथून गणित विषयात प्रथम, मोताळा इंग्लिश विषयात प्रथम, संस्थेच्या चार शाळा मधून प्रथम तसेच याच चार शाळा मधून गणित विषयात प्रथम येण्याचा बहुमान तिने पटकावला आहे. त्याबद्दल तिला सदरच्या कार्यक्रमामधे एकूण सहा प्रोत्साहनपर बक्षीस देण्यात आले. सदरचे बक्षीस मुलीचे वतीने तिचे वडील प्रशांत नारखेडे यांनी संस्थेचे अध्यक्ष आमदार चैनसूख संचेती यांचे हस्ते मान्यवरांच्या उपस्थितीत स्वीकारले. या वेळी पालक विद्यार्थी तसेच शाळेचे सर्व कर्मचारी वृंद उपस्थित होते.

## गॅस जोडणी नसलेल्या महिलांसाठी प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेची संधी; अर्ज करण्याचे आवाहन

**जनसंचलन/बुलढाणा**




अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या दि. ९ ऑक्टोबर २०२५ रोजीच्या पत्रानुसार केंद्र शासनाने प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेअंतर्गत देशभरात २५ लाख अतिरिक्त एलपीजी गॅस जोडण्या मंजूर करण्याचा निर्णय घेतला आहे. या अनुषंगाने जिल्हा उज्ज्वला समिती स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली आहे. या योजनेचा लाभ मिळण्यासाठी ज्या पात्र महिलांकडे अद्याप गॅस जोडणी नाही, त्यांनी आपल्या नजीकच्या गॅस एजन्सीकडे आवश्यक कागदपत्रांसह अर्ज तात्काळ सादर करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा प्रधानमंत्री उज्ज्वला गॅस योजना समिती अध्यक्ष डॉ. किरण पाटील यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी नागरिकांनी जवळच्या कोणत्याही गॅस एजन्सीशी संपर्क साधावा, असेही कळविण्यात आले आहे. आवश्यक कागदपत्रे : राशन कार्ड, आधारकार्ड (कुटुंबातील १८ वर्षावरील सर्व व्यक्तीचे), बँक पासबुक झेरॉक्स (महिला राष्ट्रीयकृत बँकेचे), तीन पासपोर्ट फोटो, आधारकार्ड संलग्न मोबाईल नंबर, केवायसीसाठी अर्जदार स्वत: हजर असावा, प्रधान मंत्री उज्ज्वला योजनेसाठी १४ पॉईंटचे हमीपत्र भरुन देणे लाभार्थ्यास आवश्यक आहे.

# कडाक्याच्या थंडीत गरजवंतांना मिळाली मायेची उब राजे छत्रपती ब्लड डोनर ग्रुपच्यावतीने गरजूंना ब्लँकेट वाटप



वृत्तसंस्था/वाशिम

राजे छत्रपती ब्लड डोनर ग्रुपच्यावतीने गरजू व्यक्तींना ब्लँकेट वाटप करून कडाक्याच्या थंडीत गरजवंतांना मायेची उब देण्यात आली. तसेच आधार मतिमंद निवासी विद्यालय येथे अल्पोहाराचे वाटप करण्यात आले. सदर उपक्रम हा ध्रुव हरीश सभादिंडे याच्या वाढदिवसानिमित्त विविध उपक्रम राबवून करण्यात आला. स्थानीक बालाजी मंदीर, शनीमहाराज मंदीर परीसर, छत्रपती शिवाजी महाराज चौक, पाटनी चौक, अकोला नाका, जिल्हा सामान्य रूग्णालय, बस स्थानक, पुसद नाका, रेल्वे स्टेशन परीसर या ठीकाणी गरजवंतांना मायेची उब देण्यात आली. यावेळी राजे छत्रपती ब्लड डोनर ग्रुपचे अध्यक्ष अजय मोतीवार, हरिष सभादिंडे, ताजू शेख ठेकेदार, भूषण देशपांडे, प्रतीक कांबळे, शामराव धाडवे, मंगेश वानखेडे, दिलीपभाऊ भेंडेकर, सचिन कोतीवार, किसनराव धोटे, संध्याताई सभादिंडे, सौ.देशपांडे, रुद्र खरे आदी उपस्थित होते. कडाक्याच्या थंडीत अचानक पने मिळालेल्या उबदार ब्लँकेटमुळे अनेकांच्या डोळयात आनंदाश्रु तरळले.

# लोणार सरोवर अभयारण्यात रामसर साइट येथे राज्यव्यापी आशियाई -पाणपक्षी गणना संपन्न

जनसंचलन/ लोणार



वेटलँण्ड इंटरनॅशनल साउथ एशिया , मी लोणारकर टीम, निसर्ग मल्टिपर्पज फाउंडेशन व लोणार/अकोला वन्यजीव विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १० ते १८ जानेवारी २०२६ रोजी लोणार रामसर साइट तसेच अभयारण्य लगत आशियाई पाणपक्षी गणना (एशियन वॉटरबर्ड सेंन्सेस) आयोजित करण्यात आले होते. खारे पाणी असलेले जंगल म्हणून प्रसिद्ध असलेले लोणार अभयारण्याच्या पाणथळजागा पाणपक्ष्यांसाठी नंदनवन ठरत आहेत. येथे येणाऱ्या स्थलांतरीत व स्थनिक पाणपक्ष्यांच्या नोंदी जगाच्या नकाशावर येण्यासाठी या आशियाई पाणपक्षी गणनेचे आयोजन प्रधान मुख्यवन संरक्षक (वनबल प्रमुख) श्री. एम.एस रेड्डी , अकोला वन्यजीव विभागाचे विभागीय वन अधिकारी श्री. यशवंत नागुलवार व आशियाई पाणपक्षी गणनेचे महाराष्ट्र राज्य समन्वयक डॉ. राजू कसंबे यांच्या मार्गदर्शनात करण्यात आली. या पाणपक्षी गणतेत अनेक पाणपक्ष्यांच्या नोंदी ई बर्ड इंटरनॅशनल या अँपवर नोंदविण्यात आल्या. या वर्षी कॉमन स्नाईप, ब्राह्मणी बदक, गॉडविट, रिव्हर टर्न, कॉमन पोचार्ड या पक्ष्यांची प्रामुख्याने नोंद झाली. तसेच पाणकावळा, नॉर्दन पिनटेल, शावलर, वारकरी , लाँग बिल्ड पीपेट, स्पूनबिल, ओरिएंटलडार्टर हे पक्षी मोठ्या संख्येने आढळून आले. जलशायाच्या परिसरात विविध पक्ष्यांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाल्याचे आढळून आले . मागील गणनेत १-२ च्या संख्येत दिसलेले ओरिएंटलडार्टर हे पक्षी यावर्षी मोठ्या संख्येत दिसले. लोणार रामसाइट पाणथळ, अंबर तलाव, काळा पाणी तलाव या ठिकाणी ही पाणपक्षी गणना पार पडली या पक्षी गणनेत महाराष्ट्र पक्षीमित्र संघटनेचे बुलढाणा समन्वयक व मी लोणारकर टीम चे सचिन कापुरे, पक्षीमित्र विलास जाधव, संतोष जाधव, कमलेश आगरकर, विनय कुलकर्णी तसेच हि गणना यशस्वी करण्यासाठी वनपरिक्षेत्र अधिकारी मनोज रामटेके व वनरक्षक सदाशिव वाघ यांनी व वन्यजीव लोणार टीम यांनी मोलाचे सहकार्य केले.

# हालात बदल सकते हैं! संदेशासह लोणारमध्ये सामाजिक मार्गदर्शन कार्यक्रम संपन्न...

## पीस फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष व उच्चशिक्षित वक्ते आर्किटेक्ट अर्शद शेख यांचे प्रभावी मार्गदर्शन




वृत्तसंस्था/लोणार

जमीयत उलमा ए लोणार यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेला ‍ड्ढहालात बदल सकते हैंफ्ड या विषयावरील कार्यक्रम अत्यंत यशस्वीरीत्या पार पडला. या कार्यक्रमात पीस फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष, उच्चशिक्षित व प्रख्यात सामाजिक मार्गदर्शक आर्किटेक्ट अर्शद शेख यांनी उपस्थितांना सखोल व प्रेरणादायी मार्गदर्शन केले. हा कार्यक्रम दिनांक १६ जानेवारी २०२६ रोजी, शुक्रवार, ईशा नमाजनंतर रात्री ८.३० वाजता मोहम्मदी मशीद, जम जम कॉलनी, लोणार, जिल्हा बुलढाणा येथे पार पडला. यावेळी बहुसंख्येने विविध क्षेत्रातील नागरिक उपस्थित होते. आपल्या भाषणात आर्किटेक्ट अर्शद शेख यांनी समता, समानता, बंधुप्रेम, भाईचारा व सामाजिक न्याय या मूलभूत मूल्यांवर सखोल मार्गदर्शन केले व आपले अनुभव ही व्यक्त केले. देशाच्या उज्वल भविष्यासाठी सर्वांनी एकत्र येऊन आपापल्या परीने योगदान द्यावे, देशाला समृद्ध बनवण्यासाठी सामाजिक कार्यात सक्रिय सहभाग घ्यावा, आपल्या समाजाला, गावाला, शहराला,देशाला व संपूर्ण जगाला आपल्याकडून लाभ व्हावे, या उद्देशाने सर्वांनी नियोजन व कार्य करावे असे आवाहन त्यांनी यावेळी सर्व उपस्थित मुस्लिम बांधवांना केले. कार्यक्रमास परिसरातील उलेमा, सामाजिक कार्यकर्ते, युवक, पोलीस, शिक्षक, विद्यार्थी, अधिकारी,कर्मचारी, राजकीय नेते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी जमीयत उलमा ए लोणारचे अध्यक्ष ॲड.हाजी मो. रिजवान जड्डा यांनी सर्व उपस्थितांचे तसेच कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सहकार्य करणाऱ्या सर्वांचे आभार व्यक्त केले. सामूहिक दुवेने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# भर दिवसा घरफोडी; सोने, चांदीसह रोख रक्कम लंपास

जनसंचलन/मेहकर



तालुक्यातील देऊळगाव साकर्शा येथे १९ जानेवारीला भरदिवसा घरफोडीचा धक्कादायक प्रकार घडला. अज्ञात चोरट्यांनी खिडकीतून घरात प्रवेश करून लोखंडी पेटीचा कोंडा वाकविला आणि सोन्याचे-चांदीचे दागिने तसेच रोख रक्कम असा चार लाखांचा ऐवज लंपास केला. जानेफळ पोलिसांनी २० जानेवारी रोजी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला. ठसे तज्ज्ञ व श्वान पथकासही करण्यात आले होते पाचारण देऊळगाव साकर्शा येथील सुरेश रामचंद्र नवत्रे (वय ५५) यांच्या घरातून अज्ञात आरोपीने खिडकी उघडून आत प्रवेश केला. त्यानंतर पेटीचा कोंडा वाकवून ३.९७० ग्रॅम वजनाची सोन्याची अंगठी, २०.१९० ग्रॅम वजनाची सोन्याची एकदाणी, २००.४६० ग्रॅम वजनाचे चांदीचे कडे, तसेच १० हजार रुपये रोख असा मुद्देमाल लंपास केला. सध्याच्या बाजारभावानुसार या मुद्देमालाची किंमत जवळपास चार लाख रुपयांहून अधिक आहे, असे पोलिसांनी सांगितले. घटनेची माहिती मिळताच ठसे तज्ज्ञ आणि श्वान पथकाला तातडीने पाचारण करण्यात आले. घटनास्थळी ठाणेदार अजिनाथ मोरे यांनी भेट देऊन पाहणी केली. प्रकरणाचा तपास नायब पोलिस कॉन्स्टेबल लक्ष्मण पिटकर करीत आहेत, तर पोलिस कॉन्स्टेबल विष्णू जगताप यांच्यासह पथक रात्री उशिरापर्यंत घटनास्थळी होते.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८